# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३११७ email:-establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./१८५८ /२०२३ दि. २०/०७/२०२३

## *परिपत्रक*

**संदर्भ:-** मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे पत्र दिनांक १९/०७/२०२३

विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, गडचिरोली जिल्ह्यात बऱ्याच भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या ऑरेंज अर्लट नुसार मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, अतिवृष्टीमुळे कोणत्याही प्रकारची अनुसुचित घटना घडू नये यादृष्टीने संदर्भांकित पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना दिनांक २०/०७/२०२३ रोजी सुट्टी जाहिर केलेली आहे.

सदर सुट्टी विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना व अहेरी येथील विद्यापीठाव्दारे सुरू असलेले विद्यार्थी सुविधा केंद्रास सुध्दा लागू राहील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

*१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*३. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली*
*४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.*
*५. विद्यार्थी सुविधा केंद्र, अहेरी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*

*BURADE E:\Letters\Circular 188*

महाराष्ट्र शासन
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-442605
▸ टोल फ्री क्रमांक :1077 ▸ हॉटलाईन क्र.: 2007 ▸ दूरध्वनी क्र.: 07132-222030/31/35,
▸ मोबाईल क्र.: 9423911077 ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यक/कावि-831/2023 दिनांक : 19 /07/ 2023

# आदेश

## (गडचिरोली जिल्हा सीमा क्षेत्रातील सर्व शाळा, विद्यालये, महाविद्यालये बंद करणेबाबत)

**ज्याअर्थी**, सध्या मान्सून कालावधी सुरु असून मागील दिवसांपासून गडचिरोली जिल्ह्यातील बऱ्याच भागात मुसळधार पाऊसासह अतिवृष्टी झालेली असून वैनगंगा, गोदावरी, प्राणहिता, बांडिया, पर्लकोटा, पामुलगौतम, इंद्रावती नद्यांच्या पाण्याची पातळीसुद्धा वाढत असून सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने जिल्हयातील अंतर्गत मार्ग बंद होत असतात.

**ज्याअर्थी**, भारतीय हवामान विभागाचे प्रादेशिक कार्यालय, नागपूर द्वारा आज दि. १९ /०७/ २०२३ द्वारा प्रसारित हवामान संदेशानुसार गडचिरोली जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आलेले असून वज्राघातासह, मुसळधार ते अत्यंत मुसळधार पाऊसाची दाट शक्यता आहे.

**त्याअर्थी**, मी संजय मीणा, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत पूरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत **दिनांक 20/07/ २०२३ ला गडचिरोली जिल्हा सीमाक्षेत्रामधील सर्व शाळा, विद्यालये, अंगणवाडी, महाविद्यालये सदर कालावधीत बंद असतील तसेच** सदरचे आदेश केवळ शाळा, विद्यालये, महाविद्यालये करिता लागू असून इतर सर्व कार्यालये, आस्थापना, दुकाने इत्यादींना सदरचे आदेश लागू नाही.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचे आदेश आज दिनांक १९ /०७ / २०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

Office of the District Magistrate Gadchiroli

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, गडचिरोली

//२//

**प्रतिलिपी** : माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली
2. पोलीस अधिक्षक, गडचिरोली
3. अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
4. उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) __________
5. जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली
   //- सदरचे निर्देशाबाबत यथोचित माध्यमांद्वारे व्यापक स्तरावर प्रसिध्दी करण्यात यावे.
6. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प गडचिरोली
7. तहसिलदार (सर्व), जिल्हा गडचिरोली
8. संवर्ग विकास अधिकारी (सर्व), जिल्हा गडचिरोली
9. मुख्याधिकारी(सर्व) न.प./न.पं., जिल्हा गडचिरोली
10. गटशिक्षणाधिकारी (सर्व), जिल्हा गडचिरोली

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, गडचिरोली